# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // प्रेस नोट //

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पू) गोडदेव तलावामधील पाणी प्रदूषित झाल्यामूळे तलावातील शेकडो माशांचा मृत्यु झाला असल्याची बातमी दि.22/04/2025 रोजीच्या दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द बातमी बाबत खालील प्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पू) गोडदेव गांव येथे भारतरत्न इंदिरा गांधी उद्यान असून सदर उद्यानामध्ये तलाव आहे. सदर तलावामध्ये धार्मीक उत्सवानिमित्त विविध मूर्तीचे विसर्जन करणेत येते.

सदर तलावामधील माशांचा मृत्यु होत असल्याचे दि.21/04/2025 रोजी महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्याप्रमाणे तलावामधील मृत माशे तलावामधून बाहेर काढणेत आलेले असून सदर तलावामधील पाण्याचा उपसा करणेस आज दि. 22/04/2025 रोजी सुरुवात करणेत आलेली आहे.

तसेच सदर तलावामध्ये फाउंटन बसविणेसह सभोवताली सुशोभिकरण करणेसाठी शासनाकडून मूलभूत सोई सुविधांचा विकास योजना अंतर्गत मंजूरी प्राप्त असून याबाबत ठेकेदारास कार्यादेश देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे लवकरच कामास सुरवात करणेत येणार आहे. तसेच सदर तलावामध्ये मुर्तीच्या विसर्जनासाठी Partition Wall बनवून विसर्जनाची स्वतंत्र्य व्यवस्था करणेत येणार आहे.

( दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-13/25-26/RP/P-01